# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.११/०३/२०१९
## दि.१०/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे १३६/१९,भादविक ४९८(अ),३०६,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | अब्दुल मुकादम,वय-४७,रा.रामपुर,ता.पाटण,जि.सातारा |
| **आरोपी** | १.आशपाक रशिद शेख,वय-३५ वर्षे,रा.पाटण चापोली रोड,जि.सातारा व सासु (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २००९ पासुन ते दि.२४/०२/२०१९ रोजीचे कालावधीत सैय्यदनगर गल्ली नं.१२,अे दर्ग्या शेजारी महंमदवाडी रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची बहीण नफीसा आशपाक शेख हिचे लग्न तीचा पती आशपाक रशिद शेख,वय-३५ वर्षे,रा.पाटण चापोली रोड,जि.सातारा या इसमा बरोबर होवुन,ती तीचे सासरी नांदत असताना,यातील नमुद पती व सासु यांनी संगनमत करून,तीस वेळोवेळी अपमानित करून,आशपाक याने बाहेरचे लोकांकडुन व मलकापुर येथील महिला बचत गटाचे कर्ज फेडण्यासाठी माहेराहुन पैशाची मागणी करून,तीस शिवीगाळ व हाताने मारहाण करून, टोचुन बोलुन,तीचा शारिरीक व मानसिक छळ केल्याने,त्यांचे त्रासाला कंटाळुन,नफीसा हिने दि.२४/०२/२०१९ रोजी तीचे राहते घरी विषारी औषध घेवुन,तीस घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. भगवान कांबळे ८८८८८१३६६४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे १६५/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरुष, वय ३२ वर्षे,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल धारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/१२/२०१७ रोजी १४/४५ वा.चे सुमारास ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना त्यांचे मोबाईलवर अज्ञात मोबाईल धारकाने फोन करुन, फिर्यादी यांचे बँकेचे क्रेडीट कार्डच्या नावामध्ये दुरुस्ती करण्यासाठी फिर्यादीचे मोबाईलबाबत सर्व माहिती विचारुन फिर्यादी यांचा ई-मेल हॅक करुन, त्याव्दारे ऑनलाईन मध्यमाव्दारे ८९ हजार ४०/- रुपये ट्रान्झेक्शन करुन, फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. (यातील फिर्यादी यांनी सायबर क्राईम सेल,पुणे येथे अर्ज केला असुन त्यावरुन गुन्हा दाखल केला आहे. ) |
| **त.अंमलदार** | पो.निरी. (गुन्हे) अजय वाघमारे ९८२३८११६९६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे १६६/१९,भादविक ४२०,४१७ |
| **फिर्यादी** | एक महिला, वय २३ वर्षे,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | मोबाईल धारक, बँक खाते धारक व ई-मेल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/१०/२०१८ रोजी ते दि.१०/०३/२०१९ रोजी दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील नमुद मोबाईल धारक याने फिर्यादी यांना मेसेज पाठवुन ज्युनिअर असिस्टंट या पदा साठी मेल आयडीवरुन रिझ्युम पाठविण्यास सांगुन, त्यानंतर जॉब व्हॅकन्सीस पात्रता व त्यांची फी तसेच इतर बाबी नमुद असलेली माहिती फिर्यादी यांना मेलव्दारे पाठवुन त्या पदासाठी तुम्ही पात्र आहात असे सांगुन,त्यांना वेळोवेळी फॉर्म फी, सिक्युरिटी डिपॉझिट, ट्रेनिंग चार्जेस असे सर्व मिळुन एकुण ५० हजार ५५०/- रुपये वेग-वेगळे कारणे सांगुन भारतीय विमान पतन प्राधिकरणामध्ये नोकरी देण्याचे बहाण्याने सदर इसमांचे बँक धारकाच्या खात्यामध्ये भरण्यास सांगुन,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आनंदसिंग साबळे ८६९८३२१७१७ |

## दि.११/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे ५१/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | प्रविण रानडे,वय-२६,रा.एरंडवणा,पुणे |
| **आरोपी** | दोन मोटार सायकलवरील अनोळखी तीन पुरूष व एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०३/२०१९ रोजी २१/५० मनाली हॉटेलचे जवळ एरंडवणा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांची मोटार सायकल नं.एमएच/१२/एनव्हि/८३५० हिचेवरून जात असताना,यातील नमुद दोन मोटार सायकलवरील अनोळखी तीन पुरूष व एक महिला यांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना त्यांचे गाडीचे झालेल्या नुकसान भरपाई दिली नाही म्हणुन फिर्यादी यांना शिवीगाळ व दमदाटी करून,फिर्यादी यांची मोटार सायकल ८० हजार रू किची घेवुन गेले आहेत. (सदरचा प्रकार घडल्यानंतर फिर्यादी यांनी आई-वडीलां बरोबर चर्चा करून,त्यांचे गाडीचा शोध घेवुन,त्यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.के.गोरे ९९७५०७४०६२ |

**प्रेसनोट** दिनांक २५/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन ॲक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन ॲक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटामध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रु व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

**स्पर्धेसाठीचे नियम व अटी-**

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिन्ह नसावे
२. दिनांक २५/०२/२०१९ रोजीची ही मुदत दि.१२/०३/२०१९ पर्यंत वाढविली असुन दि.१२/०३/२०१९ पर्यंत प्रवेशिका व फोटो नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील
३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरु शकतील.
४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.
५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.
६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.
७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६







जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर